**sap.rgsy2010 @ gmail. com**

एसआयआरडी-११/२०१०-११/०३
दि. २१/०१/२०११

प्रति,
**प्राचार्य,**
ग्रामसेवक/ पंचायत राज / संयुक्त प्रशिक्षण केंद्र
------------, जिल्हा ----------------

**विषय : राष्ट्रीय ग्राम स्वराज योजनेअंतर्गत प्रशिक्षण गुणवत्तापूर्वक होईल याची दक्षता घेणेबाबत..**

संदर्भ : यशदाचे पत्र क्र. एसआयआरडी-११/२०१०-११/आरडीडी/०३, दि. ०३/१२/२०१०

उपरोक्त विषयानुसार **राष्ट्रीय ग्राम स्वराज योजनेअंतर्गत** राज्यातील पंचायत राज संस्थांमधील २१ जिल्हयातील नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्यांच्या प्रशिक्षणाचा धडक कृती कार्यक्रम यशदाच्या माध्यमातून आपल्या प्रशिक्षण केंद्रामार्फत सध्या सुरु आहे हे कार्यक्रम **गुणवत्तापूर्वक होतील व निवासी असतील** याची दक्षता घेणेबाबत आपणास वेळोवेळी सुचित करणेत आले आहे.

प्रशिक्षण कार्यक्रम गुणवत्तापूर्वक होणेसाठी **किमान काही बाबींचे काटेकोरपणे पालन** होणे गरजेचे आहे जसे की,

१. प्रशिक्षण कार्यक्रमाची पूर्वतयारी वेळीच व व्यवस्थितपणे करणे. वेळापत्रकाची प्रत ( व्याख्यांत्यांच्या नावासह ) किमान ३ दिवस अगोदर यशदास, शासनास व जिल्हा परिषदेस मेलव्दारे पाठविणे.

२. सत्र संचालकांची तीनही दिवस पूर्णवेळ उपस्थिती व प्रशिक्षणार्थींशी ऊतम सुसंवाद व समन्वय.

३. प्रशिक्षणार्थींची संख्या ४० चे आसपास असणे

४. वेळापत्रक व मोडयुल्सप्रमाणेच कार्यक्रमाची आखणी व कार्यवाही

५. ऊत्तम रिर्सोस पर्सनसची निवड

६. फक्त व्याख्यान पध्दती ऐवजी केस स्टडी, रोल प्ले इ. विविध पध्दतींचा सुयोग्य वापर

७. निवास; भोजन इ. सुविद्या सुयोग्य दर्जाच्या असतील याची काळजी घेणे.

८. मुल्यमापन अहवाल भरुन घेणे व त्यातील सुचनांचा योग्य तो विचार करुन आवश्यक बदल करणे.

मात्र असे निर्दशनास आले आहे की, या सुचनांचे पालन काही केंद्रांकडून व्यवस्थितपणे होत नाही. **ही बाब अत्यंत गंभीर आहे.** या पत्राव्दारे पुन्हा एकदा सर्वांना सुचित करण्यात येते की, **प्रशिक्षण कार्यक्रम गुणवत्तापुर्वकच होतील तसेच निवासीच असतील याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी.** यात कसूर केल्यास, असे कार्यक्रम पुन्हा घेण्यासंदर्भात ( त्यासाठी निधी न देता ) सुचना देणेत येतील व तरीही सुधारणा न झाल्यास रिकव्हरी, कार्यक्रम न देणे, आदी उपाय योजावे लागतील. मात्र अशी वेळ येणार नाही अशी आशा आहे. तसेच

अहवाल पाठविणे संदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. त्या-त्या महिन्याचा भौतिक प्रगती अहवाल संदर्भिय पत्रासोबतच्या प्रपत्र **अ** व **ब** या दोन्ही नमुन्यात यशदास, शासनास व संबंधित जिल्हा परिषदेस सादर करण्यात यावेत

२. सोबतच्या प्रपत्राप्रमाणे उपस्थित झालेल्या सर्व ग्रामपंचायत सदस्यांची यादी किमान १० पर्यंत प्रत्येक महिन्यास यशदास सादर कराव्यात.

३. भौतिक प्रगती अहवाल सादर करताना ते त्या- त्या महिन्याचेच असतील याची दक्षता घ्यावी. रिपोर्टिंगसाठी एखादा कार्यक्रम.ज्या महिन्यात सुरु झालाः त्या महिन्यात तो दाखवावा. उदा. दि. ३१ जानेवारी पासून सुरु झालेला प्रशिक्षण दि. २ फेब्रुवारीस संपला असेल तर तो प्रशिक्षण कार्यक्रम हा माहे जानेवारीच्या अहवालामध्येच दर्शवावा.

४. तसेच अहवालासोबत या सोबत जोडलेल्या नमुन्यात प्रमाणपत्र देणेत यावे.

आपल्या केंद्रामार्फत माहे डिसेंबर २०१० पासून आयोजित केलेल्या सर्व उपस्थित ग्रामपंचायत सदस्यांची यादी वरील ई-मेल आयडी वर सोबतच्या नमुन्यात तात्काळ पाठविण्यात यावी.तसेच यापूर्वी सुचित केल्यानुसार प्रशिक्षण कार्यक्रमास संबंधित तालुक्याचे गट विकास अधिकारी तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांना उदघाटन / समारोप कार्यक्रमांसाठी आमंत्रित करावे व ते उपस्थित राहतील यादृष्टिने कार्यवाही व्हावी. प्रशिक्षण कार्यक्रमाचे निवडक फोटोही काढण्यात यावेत. तसेच यापूर्वी सुचित केल्युानसार रजिस्टर्स इ. मध्ये माहिती अद्यावत ठेवणेत यावी.

वरील सुचनांचे तंतोतंत पालन करणेत यावे व या पत्राची पोहोच उलटटपाली देणेत यावी.

**उपमहासंचालक तथा संचालक,**
राज्य ग्रामीण विकास संस्था

*प्रत माहितीसाठीव आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :*

१. मा. उपसचिव, ग्राम विकास व पंचायती राज विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२
२. मा. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, ---------- विभाग, जिल्हा ----------
३. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ------------, जिल्हा ---------------------
४. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.ंप ) , जिल्हा परिषद ------------, जिल्हा --------

**- कृपया आपणही वरील बाबींकडे लक्ष देऊन कार्यक्रम गुणवत्तापूर्वक होतील असे पहावे.**

## राष्ट्रीय ग्राम स्वराज योजना

## ------------ प्रशिक्षण केंद्र आयोजित

## क्षमतावृध्दी प्रशिक्षण कार्यक्रम

**दि. ते**

स्थळ : --------------------- तालुका:--------------------------- जिल्हा: ---------------

**उपस्थित ग्रामपंचायत सदस्यांची यादी**

| क्र. | कार्यक्रमाचा कालावधी | ग्रामपंचायत सदस्याचे नाव | ग्रामपंचायतीचे नाव / तालुका |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, राग्रास्वयोजने अंतर्गत क्षमतावृध्दी प्रशिक्षण कार्यक्रमा संदर्भातील माहे --------------- चा अहवालात सादर केलेली माहिती ही अचूक व बरोबर आहे. सदरचे कार्यक्रम निवासीच आयोजित केले होते व त्या अनुषंगाने आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. मुल्यमापन अहवालावरुन तसेच भेटी दरम्यान आढळून आलेल्या एकंदरीत बाबी विचारात घेता अहवालात नमूद केलेले वरीलपैकी सर्व कार्यक्रम / दि. ------ ते दि. --------- या कालावधीतील कार्यक्रम वगळता अन्य सर्व कार्यक्रम गुणवत्तापूर्वक झालेले आहेत. प्रशिक्षणासाठीच्या निधीचा विनियोग योग्य प्रकारे व त्या कारणासाठीच झालेला आहे.

**स्थळ : -----------------------------**

**दिनांक : ----------------------------**

| स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी |
|---|---|---|
| **सत्र संचालक** | **प्राचार्य, ग्रासेप्र केंद्र/ पंराप्रकें** | **गट विकास अधिकारी** |